## प्रकरण पहिले

## क्रांतिवीर जी.डी. लाड यांचे बालपण व शिक्षण

# प्रकरण पहिले

## क्रांतिवीर जी.डी. लाड यांचे बालपण व शिक्षण

प्राचीन काळापासून युरोपियन देश आणि भारत यांच्यात व्यापारी संबंध होते. एलिझाबेथ राणीच्या कारकिर्दीत इंग्लंडमध्ये पूर्वेकडील देशां-बरोबर व्यापार करण्यासाठी इ.स. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना करण्यात आली. ही व्यापाऱ्यांची संघटना म्हणजेच ईस्ट इंडिया कंपनी होय. सुरुवातीला कंपनीला ही सनद पंधरा वर्षांसाठी दिली होती. तथापि तीन वर्षांची पूर्वसूचना देऊन कंपनीची सनद काढून घेण्याचा अधिकार राजाने आपल्या-कडे ठेवला होता. दिवसेंदिवस कंपनीचा भारताबरोबरचा व्यापार वाढू लागला. इ.स. १६१५ मध्ये कंपनीने बादशहाच्या परवानगीने सूरत येथे पहिली वखार सुरू केली. इ.स. १६५७ मध्ये कंपनीला जॉईंट स्टॉक कंपनीचे स्वरूप प्राप्त झाले. इ.स. १६६१ मध्ये इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस् कडून कंपनीला न्याय-दानाचा अधिकार, वखारीभोवती तटबंदी करण्याचा अधिकार आणि संरक्षणा-साठी सैन्य ठेवण्याचा अधिकार देण्यात आले. पोर्तुगीजांनी पोर्तुगीज राजकन्येशी विवाह करणाऱ्या इंग्लंड राजास मुंबई आंदण म्हणून दिले. त्यानंतर पश्चिम किनाऱ्यावरील ते महत्त्वाचे लष्करी व व्यापारी ठाणे म्हणून प्रसिध्दीस आले. [१]

सुरुवातीला इंग्रजांनी फक्त व्यापारावरच आपले लक्ष केंद्रित केले. धर्म प्रसार करून लोकांची मने दुखावली नाहीत. [२] इंग्रजांचा भारतातील व्यापार वाढल्यानंतर इंग्लंडमधील कार्यकारी मंडळाने मुंबई, मद्रास, कलकत्ता, येथे गव्हर्नर नेमले. त्या गव्हर्नरांना वखारीवर नियंत्रण ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे, इत्यादी अधिकार देण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरुवातीच्या

काळात भारतात मुघलांचे साम्राज्य प्रबळ होते. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीला भारतामध्ये राज्य स्थापन करणे शक्य झाले नाही. इ.स. १७०७ मध्ये मुघल बादशहा औरंगजेब मरण पावला. मुघलांच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. दरम्यान मराठ्यांच्या राज्याचे साम्राज्य होऊ लागले होते. या संक्रमणावस्थेचा फायदा घेऊन ईस्ट इंडिया कंपनीने भारताच्या राजकारणात प्रवेश केला.[3] तत्कालीन राजांच्या भांडणाचा फायदा घेऊन ईस्ट इंडिया कंपनीने राजकारणात प्रवेश केला. इ.स. १७५७ मध्ये बंगालमध्ये प्लासी या ठिकाणी इंग्रज आणि बंगालचा सुभेदार सिराज उद्दौला यांच्यामध्ये झालेल्या युध्दाने भारताच्या इतिहासास वेगळे वळण लागले. प्लासीच्या युध्दात इंग्रजांना मिळालेल्या विजयामुळे भारतामध्ये ब्रिटिशांच्या सत्तेचा पाया घातला गेला.

इंग्रजांच्या राजकीय वर्चस्व स्थापनेच्या दृष्टीने १७६४ चे बक्सारचे युध्द हे प्लासीच्या लढाईपेक्षा महत्वाचे मानले जाते. इंग्रजांनी प्लासीची लढाई फंदफितुरी आणि कारस्थाने करून जिंकली. बक्सारचा विजय त्यांनी रणकौशल्यावर मिळविला. या बक्सारच्या विजयामुळे बंगालवर कंपनीचे वर्चस्व प्रस्थापित झाले. इ.स. १७५० पर्यंत इंग्रजांनी भारताच्या राजकारणात भाग घेतला नाही. इ.स. १७६१ च्या पानिपतच्या युध्दामुळे मराठे आणि मुघल दोघेही कमकुवत झाले. त्यामुळे भारताच्या राजकारणात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली. या पोकळीचा इंग्रजांनी फायदा घेऊन राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले.

इ.स. १७७५ मध्ये पहिल्या इंग्रज मराठा युध्दात इंग्रजांचा पराभव झाला. पराभव झाला तरी आपण मराठ्यांशी युध्द करू शकतो हा

आत्मविश्वास इंग्रजांच्या ठिकाणी आला. सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर इ.स. १७९६ मध्ये दुसऱ्या बाजीरावांना पेशवेपद मिळाले. मराठ्यांचे साम्राज्य सांभाळण्याची कुवत त्यांच्या ठिकाणी नव्हती. यशवंतराव होळकरांचा भाऊ विठोजी होळकर याला दुसऱ्या बाजीरावांनी हत्तीच्या पायी दिले. भावाच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी यशवंतराव पुण्यावर चालून आले. यशवंतरावबरोबर आपला टिकाव लागत नसल्याचे दिसताच दुसरे बाजीराव वसईस इंग्रजांच्या आश्रयाला गेले. इ.स. १८०२ मध्ये दुसरे बाजीराव आणि इंग्रज यांच्यामध्ये वसईचा तह करण्यात आला. या तहामुळे बाजीरावांनी तैनाती फौजेचा स्वीकार केला आणि मराठ्यांचा स्वातंत्र्यसूर्य मावळला.

वेलस्लीच्या युद्धामुळे कंपनीला आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. इ.स. १८०५ पासून सत्तेवर आलेले गव्हर्नर जनरल कॉर्नवालीस, सर जॉर्ज बार्लो व लॉर्ड मिटों यांनी फारशी युद्धे न करता हिंदी राजकारणात तटस्थतेचे धोरण स्वीकारले. असे असले तरी १८१३ मध्ये आलेल्या लॉर्ड हेस्टिंग्जने तटस्थतेचे धोरण सोडून देऊन उरलेल्या सत्ता जिंकून देशात ब्रिटिशांचे साम्राज्य उभारले. इ.स. १८१७-१८ मध्ये लुटालूट करणाऱ्या पेंढाऱ्यांचा बंदोबस्त केला. यातूनच तिसरे इंग्रज-मराठा युद्ध उद्भवले. इ.स. १८१८ मध्ये वेलस्लीने मराठ्यांचा मोड करून पेशवाईचा शेवट केला. इ.स. १८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाल्यावर पश्चिम महाराष्ट्राचा फार मोठा प्रदेश मुंबई इलाख्याला जोडण्यात आले. त्यानंर इ.स. १८१९ मध्ये माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने मुंबई इलाख्यात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित केली. [४]

## भारतात राष्ट्रीयत्वाची सुरुवात :

१९ व्या शतकाच्या सुरुवातीस भारत हे एक राष्ट्र म्हणून कधीच

ओळखले जात नसे. अनेक लहान लहान राज्याचा एक समूह म्हणूनच भारता-कडे पाहिले जात असे. ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी भारताचा चेहरा-मोहरा बदलवून टाकला. बुध्दीप्रमाण्यवादामुळे श्रध्दा, विश्वास या गोष्टी मागे पडल्या. ब्रिटिशांनी भारतात इंग्रजी शिक्षण पध्दती सुरु केल्यानंतर ख-या अर्थाने भारतीयांना पाश्चिमात्य जीवन व संस्कृती यांचा परिचय होऊ लागला. भारतातील उच्च समाजातील व्यक्तींचा आग्रह व ख्रिश्चन धर्मगुरु यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे भारतात इंग्रजी शिक्षणाची सुरुवात झाली. भारतीय समाजातील अनेक तरुणांनी स्वयंस्फुर्तीने इंग्रजीचे शिक्षण घेतले. या शिक्षणाने त्यांना बौध्दीक गुलामगिरीची जाणीव निर्माण झाली. या जाणिवेतूनच भारतीयांच्या धार्मिक वर्तणुकीचे व सामाजिक चालीरीतीचे पूनर्परिक्षण त्यांनी सुरु केले. याच नव्या जाणिवे-मुळे भारतात सुधारणांच्या चळवळीचा पाया घातला गेला. त्यातूनच भार-तातील प्रचलीत धार्मिक चालीरीतीवर कडाडून हल्ला चढविण्यात येऊ लागला. [५]

## प्रेरणादायी समृध्द इतिहास :

ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी भारतीयांना त्यांच्या इतिहासाबद्दल फारच थोडी माहिती होती. ब्रिटिश विचारवंतानी परिश्रमपूर्वक हिंदू संस्कृतीचे महात्म्य स्पष्ट केले. त्यामुळे सर्व जगात भारतीय (हिंदू) धर्म सर्वश्रेष्ठ असल्याचे भारतीयांच्या लक्षात आले. प्रचंड साम्राज्य उभे केलेल्या चंद्रगुप्त आणि सम्राट अशोक यांनी केलेल्या कार्यात भारतीय रस घेऊ लागले. महावीर, गौतम बुध्द आणि शंकराचार्य यासारख्या तत्वचिंतकांची महती पटली. डॉ. आर.सी. मुजूमदार यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास

"एकेकाळी संपूर्ण जगाच्या इतिहासात भारतीयांनी दाखविलेली कामगिरी व त्यांची भव्य उज्ज्वल परंपरा यामुळे सर्व हिंदू प्रेरित झाले. या सर्व घटकामुळे भारतीयांच्या मनात प्रखर आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे राष्ट्रीयत्वाच्या भावनेची पाळेमुळे याच समृध्द इतिहासात असल्याचे दिसून येते. [६]

"१८५७" चे बंड :

१८५७ च्या बंडामुळे भारतीयांच्या मनात राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेने मूळ धरले. सदरचे बंड अत्यंत निर्दयपणे ब्रिटिशांनी मोडून काढल्याने भारतीयांच्या मनात ब्रिटिश राजवटीबद्दल शंकाकुशंका निर्माण झाल्या. त्यातूनच भारतीय व ब्रिटिश यांचे संबंध तणावग्रस्त झाले. बंडात अनेकजण हुतात्मे झाले. त्यामुळे पुढील पिढीतील लोकांना संघर्ष करण्याची प्रेरणा मिळाली. [७]

"सामाजिक सुधारणांची चळवळ" :

ब्राम्हो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज यासारख्या सामाजिक सुधारणांच्या चळवळींनी १९ व्या शतकात धर्म आणि समाजजीवन यांच्या सुधारणांना प्रारंभ केला. जातीव्यवस्थेमुळे मानवामानवात जो भेदभाव केला जातो यावर त्यांनी कडाडून हल्ला केला. तसेच बंधुत्व आणि सामाजिक समता या कल्पनांचा त्यांनी पुरस्कार केला. याच सुमारास स्वामी विवेकानंदानी रामकृष्ण मिशनचे कार्य सुरु केले. १८९३ मध्ये शिकागो येथे भरलेल्या जागतिक परिषदेमध्ये स्वामी विवेकानंदानीआपल्या धर्माची महती स्पष्ट केली. त्यांनी हिंदू धर्माचे महत्व आणि वर्षानुवर्षे चालत आलेल्या

भारतीय संस्कृतीचे महत्व स्पष्ट केले. त्यामुळे भारतीयांचा आत्मविश्वास बळावला आणि त्यांच्या मनातील राष्ट्राभिमान जागृत केला. यामुळेच आधुनिक भारतीय राष्ट्रीयत्वाचे जनक म्हणून स्वामी विवेकानंदांकडे पाहिले जाते.

"राजकीय चळवळ" :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात बंगाल, बॉम्बे आणि मद्रास प्रांतामध्ये राजकीय चळवळी सुरु करण्यात आल्या. ईस्ट इंडिया असोसिएशन, बॉम्बे असोसिएशन, मद्रास महाजन सभा ही सामाजिक चळवळी संबंधीत नावे आढळतात. लोकांचे दु:ख निवारण व राजकीय जनजागरण हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यामध्ये इ.स. १८७८ मध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी स्थापन केलेली इंडियन असोसिएशन ही सर्वात महत्त्वाची मानली जाते. संपूर्ण भारतात त्यांनी दिलेल्या व्याख्यानामुळे लोकांच्या मनात राष्ट्रप्रेम व राष्ट्राभिमान जागृत केला. बी.बी. पाल यांच्या मते "केशवचंद्र सेन आणि ब्राम्हो-समाज यांनी धार्मिक व सामाजिक हेतूंनी जेवढी जनजागृती साधली त्यापेक्षाही अधिक विस्तारित जनजागृती सुरेंद्रनाथांच्या राजकीय प्रचारामुळे झाली.

न्यायमुर्ती रानडे यांनीही पुणे येथील सार्वजनिक सभेत मांडलेले विचार हे विचारप्रवर्तक ठरले. त्यांनी प्रत्यक्षात राजकारणात भाग घेतला नसला तरी राष्ट्रीयत्वाच्या प्रेरणेला चालना दिली. [८]

क्रांतिकारक कामगिरी :

वेळोवेळी अनेक भारतीयांनी क्रांतिकारक चळवळी केल्या. ब्रिटिश

राजसत्ता उलथवून टाकण्याचे कार्य करण्यात प्रसिद्ध क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. ते त्यांच्या पदरी जरी अपयश आले असले तरी भविष्यातील क्रांतिकारकांच्या मनात देशाभिमानाची ज्योत तेवत ठेवण्याचे त्यांनी महान कार्य केले.

लॉर्ड लिटनच्या कारकिर्दीत भारतीय राष्ट्रीयत्वाची भावना अत्युच्च टोकाला गेली. १८८३ मध्ये इल्बर्ट बिल वरून जे वाद प्रवाद निर्माण झाले व ज्याप्रमाणे ब्रिटिशांनी अन्याय केला त्यावरून आपली एक अखिल भारतीय पातळीवर राजकीय संघटना असावी असे त्यांना वाटू लागले. त्याचीच फल-श्रुती म्हणून सर ॲलन ह्युम यांनी डिसेंबर, १८८५ मध्ये इंडियन राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. [९]

## राष्ट्रीयवाद व महाराष्ट्र :

महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाल्यास राष्ट्रीय भावनेची पाळेमुळे मराठ्यांच्या इतिहासात आढळतात. इ.स. १८१८ मध्ये मराठ्यांच्या सत्तेचा शेवट झाला. दरम्यान महाराष्ट्रातील तरुणांनी इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरुवात केली. बाळशास्त्री जांभेकर, भास्कर पांडुरंग तर्खडकर, गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, दादाभाई नौरोजी व महात्मा फुले ही त्या तरुणांची नावे होत. त्यांनी मांडलेल्या विचारसरणीतून राष्ट्रीय भावनेच्या निर्मितीस सुरुवात झाल्याचे आढळते.

१९ व्या शतकातील श्री. भास्कर पांडुरंग तर्खडकर यांनी राष्ट्रीय भावनेच्या निर्मितीस सुरुवात केली. "बॉम्बे गॅझेट" या त्यांच्या वृत्तपत्रातून सलग सहा वर्षे राष्ट्रीय भावनेबाबत लेखन केले. इ.स. १८४१ मध्ये ब्रिटिश

राजसत्तेविरुध्द तर्खडकरांनी लेखन केल्याचे आढळते. भारतीयांची पिळवणूक करणाऱ्या ब्रिटिशांच्या व्यापारी वृत्तीवर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. सातारा येथील प्रतापसिंह या राजपुत्राला सिंहासनावरुन दूर केल्याबाबत त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यावर निर्भयपणे टीका केली. प्रशासनातील उच्च अधिकाऱ्यांच्यावर निर्भयपणे टीका केली. प्रशासनातील उच्च अधिकाऱ्यांचा जागापासून भारतीयांना दूर ठेवले असाही त्यांनी वारंवार उल्लेख केला.

१८७४ मध्ये पुणे येथे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी "निबंधमाला" प्रकाशित करण्यास सुरुवात केली. आपला देश आपला धर्म आणि आपली मातृभाषा याबद्दल प्रेमाची शिकवण चिपळूणकरांनी "निबंधमाले"च्या माध्यमातून सुरुवात केली. न्यायमूर्ती रानडे यांचे कार्य यामुळेच अत्यंत महत्वाचे मानले जाते. सामाजिक सुधारणेबाबत त्यांचा दृष्टिकोन अतिशय विशाल असा होता. त्यांच्या मते आर्थिक बाबतीत दुर्बल असलेले राष्ट्र सामाजिक आणि राजकीयदृष्टयासुधारणा करु शकत नाही. त्यामुळे लोकांच्या कल्याणासाठी वेगवेगळया संस्था आणि संघटना यांचे जाळे तयार केले. महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा बौध्दीक पाया घालण्याचे कार्य रानडे यांनी केले. [१०]

इ.स. १८८३ मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी लोकांच्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करण्यासाठी "केसरी", "मराठा", नावाची वृत्तपत्रे सुरु केली. सर्वसामान्यांच्या मनात राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय भावना निर्माण करणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. इ.स. १८८४ मध्ये भारतीयांचे जन जागरण करण्याच्या दृष्टीने उपयोगी पडेल अशी "डेक्कन" एज्युकेशन सोसायटी" ही संस्था टिळक आणि आगरकर यांच्या सहकार्याने चिपळूणकरांनी स्थापन केली. विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रा. आगरकर, बाळ गंगाधर टिळक, न्यायमूर्ती रानडे आणि लोकहितवादी तसेच भास्कर पांडुरंग

तर्खडकर यांच्या लिखाणामुळे लोकांच्या मनात प्रखर राष्ट्रप्रेम निर्माण झाल्याचे आढळते. [११]

"राष्ट्रवाद आणि सातारा" :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील जनजागरणाची जी मोहीम राबविण्यात आली त्यामध्ये महाराष्ट्राचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. या चळवळीपासून सातारा जिल्हा अलिप्त राहू शकला नाही. एवढेच नव्हे तर इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सातारा जिल्ह्याचे योगदान याबाबतीत उल्लेखनीय ठरते. कारण याची सर्व बीजे अनेक वर्षांपासून चालत आलेल्या ऐतिहासिक परंपरेत मिळतात. त्यामध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवली. इथपासून राष्ट्रीय भावनेची जागृती सतत होत आली असल्याचे आढळते. त्यादृष्टीने सातारा जिल्ह्याचे विविध पैलू आढळतात. ते पुढीलप्रमाणे -

१) ऐतिहासिक पार्श्वभूमी :

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांनी राष्ट्र उभारणीसाठी केलेले कार्य हे सतत अनेकांना प्रेरणादायी ठरले. समर्थ रामदास व त्यांचे धार्मिक कार्य तसेच नैतिकतेची शिकवण यामुळे लोकांच्या मनात त्याग आणि प्रतिकार याबाबतच्या भावना तयार झाल्या. छत्रपती शाहू पहिले यांच्या कारकिर्दीतील साताऱ्यातील लोकांनी मोलाची कामगिरी बजावली. याबाबतीत चतुरसिंग भोसले यांचेही कार्य अनेकांना प्रेरणादायी ठरले. स्वत्व, आदर व स्वातंत्र्य प्रेम हे गुण सातारा विभागातील लोकांच्या अंगी आढळतात.

त्यामुळेच १९ व्या शतकात सातारा जिल्हयातील लोकांच्या मनात राष्ट्रीय भावनेने चांगलेच मूळ धरले व स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचासहभाग उल्लेखनीय ठरला. [१२]

सन १९४२ चा लढा भारतीय स्वातंत्र्य लढयाचा अखेरचा टप्पा होता. कारण देशभर जनतेने उग्र आंदोलने करुन अनेक ठिकाणी प्रतिसरकारे स्थापन केली. भागलपूर, मिदनापूर, बालिया, आणि सातारा येथील क्रांतिकारकांनी दिलेला लढा अत्यंत प्रखर व वैशिष्टयपूर्ण होता. सातारा जिल्हयातील राष्ट्रीय लढयात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी अत्यंत मोलाची कामगिरी बजावली. त्यांनी साता-यातील तरुण विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रवादाची तेजस्वी प्रेरणा निर्माण केली. सातारा जिल्हयातील प्रतिसरकारची चळवळ अखेरपर्यंत चालू ठेवण्यात क्रांतिसिंह नाना पाटलांचे अनुयायी श्री. जी.डी. उर्फ बापूसाहेब लाड यांचा अत्यंत महत्त्वाचा वाटा होता हे कोणी नाकारु शकत नाही.

श्री. जी.डी. लाड यांच्या नेतृत्वात अनुवांशिकतेचा व परंपरेचा भाग नव्हताच. सामाजिक परिस्थितीवर मात करुन लोकांच्यामधून त्यांचे नेतृत्व उदयास आले. स्वातंत्र्य लढयाकडे बघण्याचा जी.डीं. चा दृष्टिकोन वेगळा होता. त्यात कोणाचा द्वेष नव्हता. त्यांचे आदर्शही वेगळे होते, त्यांचे आदर्श छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले होते. त्यांच्या शिकवणीचा वारसा घेऊन समाजकारणात व राजकारणात त्यांनी आपल्या जीवाची बाजी लावली.

स्वातंत्र्य आंदोलनात जी.डी.चे श्रध्दास्थान महात्मा गांधी होते. त्यांचा कर्मठ त्याग, समर्पण, नंगेपणा, त्यांना आकर्षित करीत होता.

भारतीय समाजजीवनात मुरलेली पिढयानपिढयांची विषमता, अंधश्रध्दा, संस्कार आणि आर्थिक पराधीनता नष्ट करण्याचे स्वप्न उरी बाळगून ते स्वातंत्र्य लढयात उतरले.

सर्वसामान्य माणसांच्या हिताच्या दृष्टीने साता-यात अनेक चळवळी झाल्या. त्यामध्ये सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, स्वातंत्र्याची चळवळ, या चळवळी महत्त्वाच्या आहेत. श्री. जी.डी. च्या या चळवळीतील कामगिरीमुळे राष्ट्रीय चळवळीस जोर चढला. हे चरित्र जी.डी. लाड यांचे एकटयाचे नसून साता-यातील लोकांनी चालविलेल्या लढयाचे चरित्र आहे. कारण इतिहास सर्व समाजाकडून घडविला जातो. श्री. जी.डी. लाड या समाजाचे प्रतिनिधी होते. सर्वसामान्य लोकांचे प्रश्न त्यांनी सोडविले आणि आजही ते तेच कार्य करीत आहेत. [१३]

श्री. जी.डी. उर्फ बापूसाहेब लाड यांचा जन्म त्यावेळच्या सातारा जिल्हयाच्या तासगाव तालुक्यातील कुंडल या लहान गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात दि. ४.१२.१९२२ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव सारजाबाई व वडिलांचे नाव दादासाहेब होते. जी.डी. बापूंच्या वयाच्या तिस-या वर्षी कॉलराच्या साथीत त्यांच्या वडिलांना मृत्यू आला. सारजाबाईने धीर न सोडता येईल त्या प्रसंगाला सामोरे जाऊन आपल्या मुलांचा सांभाळ संगोपन केले.

<u>बालपण :</u>

बालपणी जी.डी. उर्फ बापूसाहेब लाड यांचा स्वभाव अत्यंत खोडकर होता. निवांतपणा त्यांच्या स्वभावात नव्हता. विद्यार्थी दशेत ते उत्कृष्ट

खेळाडू, कुस्तीगीर, व्यायामाचे प्रेमी व शालेय विषयातही हुशार होते. वडिलांच्या आकस्मित मृत्यूमुळे लहानपणापासूनच त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले. दादासाहेबांची घरची परिस्थिती मुळातच गरिबीची होती. पतीच्या मृत्यूपूर्वी आणि मृत्यूनंतर सारजाबाईला मोल-मजुरी करून कसेबसे दिवस ढकलावे लागले.

## शिक्षण :

श्री. जी.डी. लाड यांना वयाच्या सहाव्या वर्षी कुंडल येथील खाजगी शाळेत घालण्यात आले. त्यावेळी कुंडल हे औंध संस्थानामध्ये येत होते. औंध संस्थानचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी पुरोगामी विचारसरणीचे होते. आप-ल्या राज्यातील प्रजेने शिक्षण घेतले पाहिजे, स्पृश्यास्पृश्यता गेली पाहिजे यासाठी त्यांनी राज्यात जनजागृती केली. औंध संस्थानामध्ये तयार झालेले कापड ते स्वत: वापरीत तसेच औंध संस्थानामध्ये पिकलेले अन्न खात असत. असे स्वावलंबनाचे व राष्ट्रप्रेमाचे धडे त्या काळात दिले गेले.

त्यांनी आपल्या संस्थानात इंग्रजांना भीक न घालता किर्लोस्कर यांना कारखाना उभारण्यास जागा दिली. एवढेच नव्हे तर ते दरवर्षी आपल्या संस्थानात स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरवायचे आणि स्वदेशी मालाला उत्तेजन द्यायचे. समाजात जसे वस्तूचे प्रदर्शन भरवायचे तसे शाळेतही स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरवायचे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांत स्वदेशी विषयी प्रेम आणि परकीय वस्तुविषयी तिरस्कार निर्माण होत गेला. त्यामधूनच आपण आपल्या देशासाठी काहीतरी केले पाहिजे असा ठाम विचार जी.डी.ंच्या मनात घोळू लागला. हे विचार योग्य वेळ आल्यानंतर त्यांनी आचरणात आणले.

जी.डी. लाड इयत्ता पाचवीत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखा कुंडल गावी काढण्यात आली. त्याचे नेतृत्व गावातील वतनदार, सावकार, ब्राह्मण मंडळी यांचेकडे होते. जी.डी. लाड व त्यांचे काही मित्र हिंदुत्वाचे विचाराने प्रभावित होऊन लाठीकाठी कवायत शिकण्या-साठी आर.एस्.एस्. मध्ये गेले.

जी.डीं.च्या वडीलांना वयाच्या तिसऱ्या वर्षी कॉलऱ्याच्या साथीत मृत्यू आला. घरची शेती जिरायत त्यामुळे ठोस उत्पन्न मिळत नसते. त्या-मुळे घरची परिस्थिती बेताचीच. पुस्तके विकत घ्यायला पैसे नसायचे. दरम्यान कुंडल गावातील संघ शाखा प्रमुखाने नवीन योजना मांडली. आपण शाळेची पुस्तके शाखेतर्फे खरेदी करु व कमिशन शाखेला मिळेल.

योजना चांगली वाटली पण पुस्तक घेण्यासाठी पैसे नव्हते. म्हणून शेंगा वेचून, करंज्या पाडून जी.डी. लाडांनी पुस्तकासाठी पैसे जमा करण्यास सुरुवात केली. पुस्तकाचे पूर्ण पैसे जमा झाल्यानंतर शाखेवर पुस्तकाचे पैसे भरले. पैसे भरुन दिवाळीपर्यंत पुस्तके मिळेनात म्हणून संघशाखा चालकाकडे पुस्तकाची विचारणा केली. संघ शाखा चालकाने पुस्तके दुसरीकडून घेण्यास सांगितले. त्यामुळे पुस्तकाचे भरलेले पैसे त्यानी परत मागितले. पैसे परत दिले नाहीत. कुणब्यानी विद्या शिकू नये असे उलट उत्तर देण्यात आले. तेव्हा विचारी जी.डीं.च्या बालमनावर ब्राह्मणी हिंदुत्वाचा आघात झाला. त्या आघाताने ते खचून न जाता त्यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी येडेनिपाणी येथील शिक्का छात्रालयामध्ये नाव दाखल केले. कोणत्याही परिस्थितीत शिक्षण पूर्ण करण्याची जिद्द त्यांनी मनाशी बाळगली होती. त्यामुळे येईल त्या परिस्थितीवर मात करुन त्यांनी आपले शिक्षण चालूच ठेवले. शिक्का छात्रालयामध्ये सुतकताई, विणकाम, स्वदेशी,

शिक्षण, स्वातंत्र्य इत्यादींचे संस्कार त्यांच्यावर झाले. त्या संस्कारामुळे श्री. जी.डी. लाडांच्या मनामध्ये स्वातंत्र्य चळवळीविषयी आकर्षण निर्माण झाले.

सन १९४० साली जी.डी. लाड मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी पुण्यास आले. इ.स.१९४१ मध्ये त्यांनी आपले नाव आयुर्वेद कॉलेजमध्ये दाखल केले. तेथे त्यांना प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागला. त्यांचे आयुर्वेद कॉलेजचे दुसरे वर्ष सुरु असतानाच १९४२ ची चळवळ सुरु झाली. त्यावेळी त्यांनी नाथाजीराव लाड, कै. आप्पासो लाड, कै. नाना पाटील यांचे मार्गदर्शनाखाली अनेक साथीदार जमा करुन रणांगणात पाय टाकला. सन १९४२ च्या स्वातंत्र्याच्या चळवळीत कुंडल गावातील आकाराम पवार, शामराव लाड, रामभाऊ लाड, सखाराम एडके, यांनी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता श्री. जी.डी. लाड यांना साथ दिली.

"जीवनाला कलाटणी" :

त्यावेळी कुंडल गावामध्ये एका ब्राह्मणाची पिठाची गिरणी व तेलाचा घाणा होता. सन १९३२ साली म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षी जी.डी. लाड दळप घेऊन गिरणीत गेले. त्यांच्या अंगावरील कपडे फाटके व मळलेले होते. त्या कपडयावरुन हा मुलगा महाराचा किंवा मांगाचा असावा असे त्या ब्राह्मणास वाटले. त्याने रागाच्या भरात शेंगा हालवण्याचे दांडके जी.डी. लाडांच्या डोक्यात मारले. त्यांच्या डोक्याला मार जोरात लागल्याने जी.डी. बेशुध्द पडले. ही बातमी जी.डी. लाडांच्या घरी कळाली. झाल्या प्रकाराने कुंडलमधील सर्व मराठा समाज एकत्र जमला.

त्यांनी झालल्या प्रकाराचा जाब ब्राह्मणास विचारला. त्या ब्राह्मणाने आपली चूक तात्काळ मान्य करुन सर्वांची माफी मागितली. झालेल्या प्रकाराने जी.डी. लाडांच्या कोवळया बालमनावर जबरदस्त परिणाम झाला. त्यांनी स्वत:शी विचार केला. आपण मराठा असूनही अशी वाईट वागणूक तर मग खालच्या समाजातील लोकांची काय अवस्था असेल असा प्रश्न त्यांना भेडसावू लागला.

त्या प्रसंगापासून त्यांनी वर्णविरहीत समाजरचना निर्माण करणे हे आपल्या जीवनाचे ध्येय ठरविले. तेव्हापासून त्यांनी हे ध्येय साध्य करण्यासाठी संघर्षाला सुरुवात केली आणि आजही ते कार्य चालू आहे. जात ही समाजाला लागलेली कीड आहे. ही कीड समाजपरिवर्तन करुन नष्ट केली पाहिजे असे त्यांचे ठाम मत आहे.

जी.डीं. च्या वडिलांनी (दादासाहेबांनी) आपल्या भावाला २००/- रुपये उसने दिले होते. दरम्यान दादासाहेबांचा कॉलराच्या साथीने मृत्यू झाला. पाच वर्षानंतर जी.डीं. चे काका उसने घेतलेले पैसे परत करण्यासाठी आले. त्यावेळी चलनात सुरती रुपये होते. सारजाबाई अशिक्षित असल्याने त्यांना पैसे व्यवस्थित मोजता येत नव्हते. त्यावेळी त्यांनी २० सुरती रुपयांचे १० पुंजके केले. व्याजापोटी दिलेले जादा १२०/- रुपये त्यांनी परत केले. हा प्रसंग जी.डीं.नी प्रत्यक्ष पाहिला आणि व्याज का घेतले नाही असा प्रतिप्रश्न त्यांनी आपल्या आईला केला. त्यावेळी सारजाबाईने दिलेले उत्तर मार्मिक होते. "सहजासहजी किंवा फुकट मिळालेले पैसे आपण घेऊ नये" हीच शिकवण सारजाबाईंनी आपल्या मुलांना दिली.

जी.डी. लाड शाळेत असताना दत्ता होवाळ आणि मधूकर कुलकर्णी हे दोन अत्यंत जिवाभावाचे वर्गमित्र होते. त्यापैकी दत्ता होवाळ हा मागास-

लेल्या समाजातील होता. जी.डी. लाड दत्ता होवाळबरोबर एकत्र जेवण करीत. हाप्रताप घरी कळल्यानंतर आईने होवाळबरोबर एकत्र जेवणास विरोध केला. तेव्हा जी.डी. नी मोठा मार्मिक प्रश्न विचारला की, का एकत्र जेवण करावयाचे नाही. परंतु बंडखोर वृत्तीच्या जी.डी. नी एकत्र जेवण करण्याचे सोडले नाही. जात, पात, धर्म या गोष्टी जी.डी. ना कळत नसल्यातरी आपण सर्व एक आहोत, समान आहोत ही भावना त्यांच्या मनी होती.

सारजाबाईचा मुलगा गणपती एका मागासलेल्या मुलांबरोबर एकत्र जेवण करतो ही गोष्ट त्यांच्या भावकीतील लोकांना समजली. गावात सर्वत्र एकच चर्चेचा विषय झाला. उपहासाने लोक म्हणू लागले, सारजाबाई तुझा मुलगा एक ना एक दिवस तुझ्या घरावर विस्तव ठेवल्याशिवाय राहणार नाही.

जी.डी. लाड शाळेत शिकत असताना राधगावकर, देशपांडे, इत्यादी शिक्षकांनी त्यांच्यावर जे संस्कार केले त्यामुळे त्यांच्यात विधायक कार्य करण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला. देशपांडे सर स्वातंत्र्याविषयी खूप माहिती सांगायचे. तसेच ते स्वत: खादी वापरायचे आणि खादीचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून द्यायचे. इंग्रज हे परकीय आहेत ते आपल्यावर अन्याय करतात, आर्थिक पिळवणूक कसे करतात याविषयी नेहमी माहिती सांगायचे. त्यामुळे आपल्या देशाला काहीही करुन स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे विचार जी.डी. च्या मनात यायचे. शिक्षणाने स्वकीय आणि परकीय याची समज आल्यानंतर कालांतराने त्यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीच्या होमकुंडामध्ये स्वत:ला झोकून दिले.

औंध संस्थानचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी राष्ट्रवादी होते. त्यांनी आपल्या संस्थानात ब्रिटिशांची पर्वा न करता स्वदेशी वस्तूंना उत्तेजन देण्यासाठी लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना कारखाना उभारण्यास जागा दिली. एवढेच नव्हे तर त्यांच्या संस्थानात दरवर्षी स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरवायचे. त्यांनी शाळेत देखील दरवर्षी स्वदेशी वस्तूंचे पदर्शन भरविले. त्यामुळे शाळेतील बालमुलांच्या मनावर स्वदेशी विषयी प्रेम व परकीय वस्तूविषयी तिरस्कार निर्माण होत गेला. त्यातूनच त्यांच्या मनाची जडणघडण झाली. योग्य वेळ येताच त्यांनी ते विचार प्रत्यक्ष कृतीतून आचरणात आणण्यास सुरुवात केली. [१४]

......

## संदर्भग्रंथ

1) Mahajan V.D. Modern Indian History, P. 28.

2) Ibid P. 30.

3) Ibid P. 31.

4) Ibid P. 43.

5) Bhavan's British Paramountey and Indian Renaissance P. 88.

6) O' Molley edited - Modern India and the West, P.61, 61.

7) Mookherji, S.B., India since 1857, P. 135, 136.

8) Dr. Bhosale A.R., Freedom Movement in Satara District, (from 1835 to 1947), P. 49.

9) Mookherji S.B., India since 1827, P. 135, 136.

10) Smith Anthony D. Current Sociology Nationalism Vol. XXI, P. 98.

11) Acharya Javadekar, Adhunik Bharat (Marathi), P. 147, 155.

१२) गोखले पी.पी., परिचीत सातारा, पृ. ४०.

१३) लाड जी.डी., पेटलेले पारतंत्र्य धुमसते स्वातंत्र्य, पृ. ४ व ५.

१४) लाड जी.डी., मुलाखत, दि. ३०.५.९५, नाना पाटील, विद्यार्थी वसतिगृह, कुंडल, (जि. सांगली.)

.....